<u>राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई</u>
निधी वितरीत करण्यास मंजुरी देणेबाबत.
(सन २०१७-१८-I)

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः काररसे-२०१७/प्र.क्र.२६१/आ-५,

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
संकुल इमारत, ८ व १० मजला,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई- ४०० ००१.
दिनांक : २६ सप्टेंबर, २०१७

<u>वाचा :</u>

१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांकः अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन ज्ञापन क्रमांक : अर्थसं-२०१७/प्र.क्र.१०५/अर्थसंकल्प, दि. ३० मे, २०१७.
३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांकः अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३० जून, २०१७
४) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे क्रमांक : संआसे/सहाय्यक अनुदाने-रा.र.सं.प./ २०१७/१३१४, दि. २४ जून, २०१७ रोजीचे पत्र.

<u>प्रस्तावना</u> :

राज्य रक्त संक्रमण परिषद ही शासकीय स्वायत्त संस्था असून या संस्थेचा मूळ उद्देश राज्यात सुरक्षित रक्ताचा मुबलक पुरवठा वाजवी किंमतीत व्हावा हा आहे. या संस्थेसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रु.४४.०० कोटी इतका निधी सहाय्यक अनुदाने म्हणून अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. वित्त विभागाने ज्या योजनांकरीता सन २०१७-१८ साठी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे, अशा योजनांना अर्थसंकल्पित तरतुदीपैकी ८०% इतका निधी वितरीत करण्यास दि.१८ एप्रिल, २०१७ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये मंजुरी दिली होती. परंतु तद्नंतर वित्त विभागाने शासन परिपत्रक दि.३० जून, २०१७ अन्वये ८०% ऐवजी ७०% निधी वितरीत करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार राज्य रक्त संक्रमण परिषदेसाठी सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी अर्थसंकल्पित केलेल्या रु.४४.०० कोटी तरतुदीपैकी ७०% मर्यादेनुसार रु.३०.८० कोटी इतका निधी वितरणासाठी उपलब्ध आहे. सदर उपलब्ध तरतूदीमधून राज्य रक्त संक्रमण परिषदेस प्रथम दोन महिने कालावधीतील (एप्रिल व मे, २०१७) खर्च भागविण्यासाठी रु.५,६१,५६,०००/- (अक्षरी रुपये- पाच कोटी, एकसष्ट लक्ष छप्पन्न हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्यास मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. शासन याबाबत पुढीलप्रमाणे शासन मंजुरी देत आहे.

<u>शासन निर्णय :</u>

राज्य रक्त संक्रमण परिषदेकरीता सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी अर्थसंकल्पित रु.४४.०० कोटी इतक्या तरतुदीपैकी प्रथम दोन महिने कालावधीतील (एप्रिल, मे, २०१७) खर्च भागविण्यासाठी रु.५,६१,५६,०००/- (अक्षरी रुपये- पाच कोटी एकसष्ट लक्ष छप्पन्न हजार फक्त) इतके सहायक अनुदान वितरीत करण्यास याद्वारे शासन मंजुरी देण्यात येत आहे.

सदर मंजूर अनुदानातून राज्य रक्त संक्रमण परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध लोकोपयोगी योजना, कर्मचारी वर्गाचे वेतन, रक्तपेढयांना पुरविण्यात येणाऱ्या साहित्य सामुग्रीवरील खर्च भागविण्यात यावा.

सदरचा खर्च खाली दर्शविलेल्या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वर्षासाठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

मागणी क्र. आर-१
२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०१- नागरी आरोग्य सेवा विषम चिकित्सा
११०- रुग्णालये व दवाखाने
राज्य योजनांतर्गत योजना
(०६) (२५) रक्त संक्रमण सेवा
३१- सहाय्यक अनुदाने (२२१० ४४७३)

राज्य रक्त संक्रमण परिषदेस वितरीत अनुदानाशी संबंधीत खर्चाचे देयक अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचेकडे सादर करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना व सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७ सोबतच्या परिशिष्टातील अनु.क्र.८ मध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. सदर प्रस्तावाशी संबंधित लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र राज्य रक्त संक्रमण परिषदेने सादर केले असून, यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरिक्षण /महालेखापाल यांचे गंभीर आक्षेप नाहीत. या योजनेंतर्गतचा निधी लाभार्थ्याच्या थेट खात्यात जमा होत नाही. सदर योजनेंतर्गत वस्तू खरेदी प्रस्तावात खरेदी नियोजन करण्यात येते व आवश्यकतेनुसार दरकरारावर खरेदी करण्यात येते. तसेच भांडवली वस्तूंच्या खरेदी नंतर स्टॉक रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येते. सदर योजनेच्या

संबंधित लेखाशिर्षाखाली एक वर्ष जुने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही. सदर योजनेंतर्गत वितरीत केलेल्या निधीचे नियंत्रण नियंत्रक अधिकाऱ्यांमार्फत केले जाते.

सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२६१२०८२०१४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sharad B. Londhe

Digitally signed by Sharad B. Londhe
DN: CN = Sharad B. Londhe, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2017.09.26 15:52:50 +05'30'

(श. बा. लोंढे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई.
३. संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई.
४. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता) आणि (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर.
५. अधिदान व लेखा अधिकारी, लेखा व कोषागारे, मुंबई.
६. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
७. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
९. नियोजन विभाग (का.१४७२), मंत्रालय, मुंबई.
१०.वित्त विभाग, (व्यय-१३), (अर्थसंकल्प-९), (अर्थ-३), मंत्रालय, मुंबई.
११.सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प शाखा), (लेखा शाखा), मंत्रालय, मुंबई.
१२.निवडनस्ती (आरोग्य-५)